# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**भुसावळ (जि.जळगांव) येथील वरणगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र चालू करण्याबाबत**

**(१) १५५० (२३-१२-२०१४). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील वरणगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्राला राज्यशासनाने मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप पोलीस प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, सदर पोलीस प्रशिक्षण केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) जळगांव जिल्ह्यातील भुसावळ येथील वरणगांव येथे पोलीस प्रशिक्षण केंद्र, वरणगांवासाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) परिसरात राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारण्याबाबत**

**(२) ८४७९ (०६-०४-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) परिसरात राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारणीबाबत शासकीय ई-क्लास जमिनीची पाहणी राज्य राखीव दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक श्री.सुनिल रामानंद यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०१२ रोजी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी लागणारी पुरेशी शासकीय जमीन खामगांव नजीक उपलब्ध आहे, येथे सदर प्रशिक्षण केंद्र झाल्यास अकोला, बुलढाणा, वाशिम या तीन जिल्ह्यांना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून फायदा होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र खामगाव येथे उभारणीबाबतच्या प्रस्तावाला तात्काळ मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय.
(२), (३) व (४) खामगाव (जि.बुलढाणा) शिवारात राज्य राखीव पोलीस दलाचे प्रशिक्षण केंद्र उभारणीबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

## राज्यातील खेळाडूंसाठीच्या ५ टक्के आरक्षणातून पोलीसांच्या जून २०१४ मध्ये झालेल्या भरती निवड प्रक्रियेबाबत

**(३) ९५५८ (०६-०४-२०१५). श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीसांच्या जून २०१४ मध्ये झालेल्या भरतीमध्ये मुंबई, पुणे, मुंबई लोहमार्ग, पुणे ग्रामीण, रत्नागिरी, उस्मानाबाद इत्यादी जिल्हा व शहर कार्यालयासाठी खेळाडुंसाठीच्या ५ टक्के आरक्षणातून पोलीस शिपाई या पदांची निवड करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भरती प्रक्रीया पुर्ण होऊन वैद्यकीय चाचणी व चरित्र्य पडताळणी झाल्यानंतर पात्र असूनही १) मुटेकर रोशन नवनाथ २) जाधव सागर साहेबराव ३) लेगरे संदिप परशुराम व इतर १६३ पात्र खेळाडूंना अद्यापही प्रमाणपत्र पडताळणी करुन दिली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ११ सप्टेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री यांना याबाबत निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) सदरचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, पोलीस शिपाई पदासाठी भरती प्रक्रिया केलेल्या संबंधित जिल्ह्याच्या घटक प्रमुखांकडून उमेदवारांची खेळाची प्रमाणपत्रे पडताळणी करुन अहवाल पाठविण्याबाबत संचालक, क्रिडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात आली आहे.

---

**नाशिक येथील सातपूर एमआयडीसी मधील एशिया ऑटोमेटिव्ह लि. कारखान्यांच्या आवारातील चंदनाच्या झाडांची चोरी झाल्याबाबत**

**(४) २२४३९ (३१-०७-२०१५). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील सातपूर एमआयडीसी मधील एशिया ऑटोमेटिव्ह लि. कारखान्यांच्या आवारातील चंदनाच्या झाडांची चोरीची घटना दिनांक २२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी कंपनीच्या मालकांनी चोरटयांनी धमकी दिल्याची तक्रार चोरीची घटना घडण्याअगोदर पोलिसांना दिली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी सातपुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ६३/२०१५ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे दि. २४/०५/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यात एकुण ३ आरोपींना दि. ९/०७/२०१५ रोजी अटक करण्यात आलेली आहे. तसेच अटक आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदरचा गुन्हा मा.न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील पोलीस दलात १२ हजार पदे भरण्याबाबत**

**(५) २८७२० (२१-०१-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस दलात पोलीस, अधिकारी यांची १२ हजार रिक्त पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव गृह विभागाकडे मंजूरीसाठी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या फारच कमी असून त्यात अनेक कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत तर काही कर्मचारी कौटुंबिक व वैद्यकीय कारणास्तव रजेवर जात असल्यामुळे त्यांच्या कामाचा अतिरिक्त ताण कार्यरत कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांच्या नवीन पदभरती प्रक्रियेला बराच विलंब होत असल्यामुळे वाढलेल्या गुन्हेगारीच्या घटनेवर नियंत्रण व अंकुश लावण्याकरिता गृह विभाग पोलीस पद भरती प्रक्रिया राबविण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) नाही.
(२), (३) व (४) राज्यातील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची सरळसेवेने रिक्त होणारी पदे दरवर्षी भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. राज्यातील पोलीस शिपाई संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही प्रचलित शासनाच्या आदेशानुसार सुरु करण्यात आली आहे. तसेच पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक या दर्जापर्यंतची पदे पदोन्नतीने भरण्याबाबत पोलीस महासंचालक यांच्यास्तरावर सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व समोदशक, राज्य राखीव पोलीस बल गट यांना वेळोवेळी सूचना देण्यात येतात.

---

**वरुर (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) येथे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(६) ३३४२३ (२१-०१-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुर (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) येथे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे व चोरट्यांना पकडण्यात पोलीसांना अपयश येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :**(१) हे खरे नाही.
वरुर, ता.शेवगांव येथे सन २०१५ मध्ये एक घरफोडीचा गुन्हा दाखल असून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झालेली नाही.
(२) उक्त नमुद चोरीबाबत शेवगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ११८/२०१५ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०, प्रमाणे दि.१५/०५/२०१५ रोजी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा उघडकीस येण्याकामी एकूण ६ साक्षीदार तपासले असून त्यानुसार गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## नागपूर येथील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात नविन पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(७) ३६३३१ (२३-०२-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात वाढती गुन्हेगारी कायदा व सुव्यवस्था अबाधीत ठेवण्यासाठी नविन पोलीस स्टेशन सुरु करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळून सुध्दा अद्यापपर्यंत काम सुरु करण्यात आले नसल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ च्या दरम्यान निदशर्नास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुटीबोर स्टेशनकरीता राज्य शासनाने एमआयडीसीकडून आवश्यक असलेली ७,६६७ चौ.मी. जागेपैकी ४००० चौ.मी.जागा मिळवून दिली परंतू बांधकाम अद्यापपर्यंत सुरु करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशनचे बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१), (२) व (३) नागपूर येथे एमआयडीसी, बुटीबोरी हे नवीन पोलीस ठाणे, एमआयडीसी, बुटीबोरीच्या सीएफसी इमारतीत दिनांक ०१.०७.२०१६ रोजीपासून कार्यान्वित करण्यात आले आहे.

एमआयडीसी, बुटीबोरी यांच्याकडून प्राप्त ४००० चौ.मी. जागेवर पोलीस स्टेशन, बुटीबोरीची नवी इमारत, पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थानांचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई यांच्यामार्फत प्रस्तावित असून याकरिता वास्तुविशारद यांची नेमणूक केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील पोलीस स्टेशनला गुन्हे तपास निधी उपलब्ध करणेबाबत

**(८) ४१३९३ (२०-०५-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील 'अ' गटात येणाऱ्या १० आणि 'ब' गटात येणाऱ्या १२ अश्या एकूण २२ पोलिस ठाण्यांना राज्य शासनातर्फे गुन्हे तपासणीसाठी मिळणारा प्रति महिना अकरा हजार रुपये याप्रमाणे सुमारे ३८ लाख १६ हजारांचा निधी दीड वर्षापासून प्राप्त झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी अभावी संबंधीत पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांना विविध गुन्ह्यांचा तपास स्वखर्चातून करावा लागत असल्याने अधिकारी आणि कर्मचा-यांना गुन्हे तपासणीत होणारी गैरसोय लक्षात घेता प्रलंबित निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०१५-१६ करिता महाराष्ट्र पोलीस दलातील तपासी अधिकारी यांना घटक निहाय तपास निधी रु.२०,००,००,०००/- (अक्षरी रुपये वीस कोटी) अनुदानाचे वाटप करण्यात आले असून त्यापैकी रु.२८,२५,४००/- अनुदान पोलीस अधीक्षक, लातूर यांना वाटप करण्यात आले आहे.

तसेच सन २०१६-१७ करिता महाराष्ट्र पोलीस दलातील तपासी अधिकारी यांना घटक निहाय तपास निधी रु. २०,००,००,०००/- (अक्षरी रुपये वीस कोटी) अनुदानाचे वाटप करण्यात आले असून, त्यापैकी रु.२६,५९,२००/- अनुदान पोलीस अधीक्षक, लातूर यांना वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जयसिंगपूर (जि.कोल्हापूर) शहरामध्ये वाहतूक कोंडी दूर करण्याबाबत

**(९) ४६३०७ (२८-०४-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जयसिंगपूर (जि.कोल्हापूर) शहरामध्ये अवजड वाहनांच्या वाहतुकीची वर्दळ वाढल्याने नागरिकांना नेहमीच वाहतूक कोंडीला समोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याकरिता पर्यायी बायपास रस्त्याने वाहतूक सुरु करण्याची तेथील नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही वाहतूक कोंडी दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जयसिंगपूर शहरातील वाहतुक कोंडीचा प्रश्न पुर्णपणे मार्गी लागावा याकरीता शहरातील मुख्य रस्त्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे वाहतुक नियंत्रणाचा आराखडा तयार करुन महत्वाच्या ठिकाणी वाहतुकीसंदर्भातील वेगवेगळी बोधचिन्हे, फलक, वाहतुक व्यवस्था, पार्किग व्यवस्था, नो पार्किंग झोन याप्रमाणे वाहतूक व्यवस्था राबविण्यास मंजूरी मिळावी याकरीता नगर परिषदेमार्फत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे स्तरावर कार्यवाही चालू आहे.

जयसिंगपूर पोलीस ठाणे व नगर परिषद, जयसिंगपूर यांच्या संयुक्त मोहिमेद्वारे वाहतुक सुरळीत ठेवण्यात येते. तसेच वाहतुक नियंत्रणाकरीता पोलिसांची नेमणूक करण्यात येते.

शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी जयसिंगपूर पोलीसांमार्फत मोटर वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

| वर्ष | केसेस दाखल | दंड (रु.) |
|---|---|---|
| २०१४ | ७०० | ९१,९०० |
| २०१५ | ७०२ | ८०,००० |
| २०१६ (माहे नोव्हेंबर पर्यंत) | ६८८ | ९१,१०० |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे होर्टी (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील मासेमारी करणाऱ्या तरुणावर झालेल्या हल्याबाबत**

**(१०) ४८६२५ (२०-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे होर्टी (ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथील होर्टी शिवारातील साठवण तलावात दिनांक ०१ जुलै, २०१५ रोजी श्री. संजय सीताराम नारायणकर या मासेमारी करणाऱ्या तरुणाला निरंजन देविदास राठोड व इतर तिघांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्याप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची लेखी तक्रार राज्य पोलीस मुख्यालय (मुंबई) तसेच पोलीस अधीक्षक (उस्मानाबाद) यांच्याकडे दिनांक ०३ जुलै, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरण भांडण तक्रार आपसात मिटले असल्याबाबत संबंधीत अर्जदार / गैरअर्जदार यांनी पोलीस ठाणे अंमलदारास लेखी जबाब दिलेले ओत. त्यामुळे पुढील कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

## लातूर येथे बनावट जात वैधता प्रमाणपत्र वितरण करणाऱ्या टोळीद्वारे झालेल्या फसवणुकीच्या प्रकरणाच्या तपासाबाबत

**(११) ५११९९ (२०-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर पोलिसांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र वाटप करणारी टोळी व त्या प्रमाणपत्राच्या आधारे अनेकांनी शासकीय नौकरी मिळवल्याची व शासनाची फसवणूक केल्याने याबाबत तपास सुरु केल्याचे दिनांक १० जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास, सदर तपासात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१. पोलीस स्टेशन शिवाजीनगर लातूर येथे गु.र.नं. ११/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६८, ४७१

२. कोथरुड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४२०/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४७१.

३. चिंचवड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १५९/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७.

तपासात एकूण ७ जणांनी बनावट जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यापैकी ३ आरोपीनी बनावट जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे पी.एम.पी.एम.एल पुणे येथे नोकरी मिळविली असल्याने त्यांना सन २०१४ मध्ये सेवामुक्त करण्यात आले आहे व इतर ४ जणांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे शाळा, कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला आहे. त्यापैकी एका विद्यार्थिनीचा प्रवेश रद्द करण्यात आला आहे. सदर गुन्हयांत बनावट जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देणाऱ्या ४ एजंटना अटक करण्यात आली असून सदर गुन्हयांचा अधिक तपास चालु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## पालघर जिल्हयातील पोलीसांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) ५१३४९ (१७-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा पोलीस अधिक्षक, यांनी जिल्हयात एकूण ५५९ पोलीस कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असून ती त्वरीत भरण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात बहुतांश आदिवासी असून वाढत्या औद्योगिक वसाहती व नागरी वसाहती असल्याने गुन्हेगारीचे प्रमाणात वाढ तसेच अपूरा कर्मचारी वर्ग इत्यादीमुळे पोलीसांवर कामाचा ताण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) नाही.
(२), (३) व (४) पालघर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर दि.१४/०१/२०१५ च्या शासन आदेशान्वये २५३ नवीन पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच, पोलीस शिपाई संवर्गातील ऑगस्ट, २०१६ पर्यंत रिक्त होणाऱ्या ३६६ पदांपैकी २७५ पदे भरण्याबाबतची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असून उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**लोणार (जि. बुलढाणा) येथील पोलिस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१३) ५४६२६ (२७-०९-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार (जि. बुलढाणा) येथे पोलिस कर्मचाऱ्यांकरिता बांधलेल्या निवासस्थानांची दुरावस्था झाली असून काही निवासस्थानांमध्ये जुगाराचे अड्डे सुरु असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवासस्थानांमध्ये सुरु असलेल्या जुगाराच्या अड्डयांबाबत तसेच निवासस्थानांची दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) लोणार (जि.बुलढाणा) येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरावस्था झालेली आहे. मात्र, सदर निवासस्थानामध्ये कोणत्याही प्रकारचा जुगार खेळला जात नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल नाही.
(२) पोलीस स्टेशन लोणार येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी शासकीय निवासस्थान बांधण्याबाबतचे नकाशे व अंदाजपत्रके याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून पत्रव्यवहार चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरात बांधकाम व्यावसायिकांचे ३ लाख रुपये चोरटयांनी पळविल्याबाबत**

**(१४) ५४६७९ (२३-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात स्वातंत्र्य चौकातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेतून दिनांक १६ मे, २०१६ रोजी बांधकाम व्यावसायिकांचे कर्जाचे मंजूर झालेले ३ लाख रुपये चोरटयांनी पळविले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे भाग ५ गुरनं. ७१/२०१६ भादंविक. ३९२, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्या अनुषंगाने आवश्यक साक्षीदारांना विचारपूस केली असून अभिलेखावरील निष्पन्न गुन्हेगारांना विचारपूस करुन तसेच संशयितांच्या घरझडत्या घेवून आरोपी निष्पन्न करण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करुनही सद्यस्थितीत गुन्हा उघडकीस आलेला नाही. सदर गुन्हा उघडकीस आणण्याचा प्रयत्न चालू आहे.

(३) कायदेशीर कारवाई पूर्ण करण्यास विलंब झालेला नाही.

---

### मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) पूनमनगर येथील म्हाडाच्या पोलीस वसाहतीची झालेली दुरावस्था

**(१५) ५५००० (२३-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) पूनमनगर येथील म्हाडाच्या पोलीस वसाहतीमधील इमारतींचे स्लॅब, बाल्कनी इत्यादी दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास कोसळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॉलनीची अवस्था अतिशय बिकट झाली असल्यामुळे इमारतीतील अनेक रहिवासी खोल्या सोडून गेले असून उर्वरित रहिवाशांकडे कोणताही पर्याय नसल्याने आपला जीव मुठीत घेऊन राहावे लागत असल्यामुळे उक्त इमारतीच्या दुरुस्तीबाबत वारंवार निवेदन देऊनही त्याकडे सामाजिक बांधकाम विभागाकडून कोणतेही ठोस आश्वासन दिले नसून जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रश्नाची तीव्रता लक्षात घेता शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर वसाहतीच्या दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असून त्यासाठी दिनांक ०७.०९.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली असून दिनांक ०३.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी उपलब्ध करून दिला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक परिसरात गत चार महिन्यात ३५ हत्या झाल्याबाबत**

**(१६) ५५५०२ (२३-०८-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक परिसरात पोलीस विभागाच्या दुर्लक्षपणामूळे गत चार महिन्यात विविध ठिकाणी जवळपास ३५ हत्या झाल्या असल्याचे दिनांक ८ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका पाठोपाठ एक हत्या होत असल्यामूळे नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) जानेवारी, २०१६ ते ०८ जून २०१६ दरम्यान पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर अंतर्गत एकुण २३ खुनाचे गुन्हे दाखल असुन, २५ व्यक्ती मयत आहेत. तसेच ऑगस्ट २०१६ अखेर एकुण २८ गुन्हे दाखल असुन ३२ व्यक्ती मयत आहेत.
(२) सदर दाखल खुनाच्या घटना वैयक्तिक भांडणे, कौटुंबिक कारण व आपसातील वाद या कारणांमुळे झालेल्या आहेत. या घटनामध्ये टोळीयुध्दा सारखे गुन्हे दाखल नाहीत. या सदराखालील सर्व गुन्हे उघडकीस आलेले आहेत. गुन्ह्यांतील संबंधीत आरोपीतांना अटक करण्यात आली असून नागरिकांमध्ये कुठल्याही प्रकारचे भितीचे व दहशतीचे वातावरण पसरलेले नाही.
(३) अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसावा व गुन्हेगारांवर वचक राहावा म्हणून, पोलीस आयुक्तालय स्तरावर वेळोवेळी प्रतिबंधामक कारवाई, कॉम्बींग ऑपरेशन, गुन्हेगार चेकिंग, दैनंदिन नाकाबंदी, प्रभावी गस्त, ऑपरेशन ऑल आउट, हद्दपार, मोक्का, एमपीडीए, तडीपार यांसारखी कारवाई करण्यात येत आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**अंधेरी-वर्सोवा परिसरात नळ दुरुस्तीसाठी विहिरीत उतरलेल्या दोन कामगारांचा गुदमरुन मृत्यु झाल्याबाबत**

**(१७) ५६३१० (२९-०८-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी-वर्सोवा परिसरात नळ दुरुस्तीसाठी विहिरीत उतरलेल्या दोन कामगारांचा गुदमरुन मृत्यु झाल्याची घटना घडल्याचे दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) होय, सदरची घटना दिनांक १०/०५/२०१६ रोजी घडली आहे.

(२) दिनांक १०/०५/२०१६ रोजी जुबली अपार्टमेंट, यारी रोड, अंधेरी (प.), मुंबई येथे काम करत असलेल्या रिंगवेल (छोटी विहीर) च्या साफसफाईचे काम करत असताना दोन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत वर्सोवा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १७०/२०१६, भादंवि कलम ३०४ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात आरोपी ठेकेदाराने रिंगवेल साफसफाई करणेकामी सुरक्षेच्या कोणत्याही साधनाशिवाय कामगारांना रिंगवेलमध्ये उतरवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने ठेकेदारास अटक करण्यात आली असून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव शहरातील अनेक भागात सट्टा, जुगार व अवैध धंदे सर्रास सुरु असल्याबाबत**

**(१८) ५६९८४ (२३-०८-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरातील अनेक भागात सट्टा, जुगार सर्रास सुरु असून जुने बस स्थानक परिसरात दाणाबाजारजवळ असलेल्या जुगार अड्ड्यावर दिनांक १० एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास हाणामारी होऊन दोन तरुण गंभीर जखमी झाल्याने परिसरात तणावाची स्थिती निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शहरातील अनेक भागात अवैध धंदे सुरु असून हॉटेल्स, बिअर बार व दुकाने रात्री ११ वाजेनंतर बंद करण्याचे आदेश असतांनाही रात्री उशिरापर्यंत सुरु राहत असल्याने शहरात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी

तसेच तेथील जनतेने गत काही महिन्यापासून पोलीसांकडे तक्रारी करुनही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :**(१) नाही.

सदरची घटना रस्त्यात मोटार सायकल लावली म्हणून बाचाबाची नंतर घडली. या अनुषंगाने जळगांव शहर पो.स्टे. गु.र.नं. ४१/२०१६ भा.दं.वि. कलम १४३, १४८, १४९, ३२४, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमुद घटनेचे वेळी सदर भागात तणाव निर्माण झाला नाही.
(२) जळगांव शहर हद्दीत अथवा परिसरात कोणत्याही स्वरुपाचे अवैध धंदे सुरु नाहीत. पोलीसांची नजर चुकवून अवैध धंद्यातील समाजकंटक गुन्हेगारांविरुध्द सातत्याने कारवाई करण्यात आली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींचे माध्यमातून अवैध धंदे सदरात माहिती उपलब्ध होताच त्वरेने गुन्हेगारांविरुध्द कार्यवाही करण्यात आली आहे. मर्यादेपेक्षा जास्त काळ सुरु असणाऱ्या दुकान चालकांविरुध्द ८१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.
(३) सदर गुन्हे तपासात साक्षीदार तपासणी, गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्याची कारवाई करण्यात आली असून उपलब्ध ठोस पुराव्या आधारे एकूण ५ आरोपींविरुध्द प्रथम श्रेणी न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### नाशिक शहरातील अंबड लिंक रोडवरील श्री अपार्टमेंटमधील वाहनतळावरील सहा दुचाकी गाड्या जाळण्यात आल्याबाबत

**(१९) ५७०१२ (२४-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील अंबड लिंक रोडवरील महालक्ष्मीनगर भागातील श्री अपार्टमेंटमधील वाहनतळावरील सहा दुचाकी गाड्या दिनांक ११ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास जाळण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरात गाड्या जाळण्याचे प्रकार वांरवार घडत असूनही या संबंधात पोलिस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी पोलीस ठाणे स्तरावर अधिक परिणामकारक कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी सुचना देण्यात येतात. तरी देखील अशा प्रकरच्या घटना घडल्यास त्याची तात्काळ दखल पोलीस प्रशासनाकडून घेतली जाते. उपरोक्त प्रकरणी अंबड पोलीस ठाणेस गु.रं.नं. ११२/२०१६ भादंवि कलम ३३५, ४२७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने, सदर परिसरात नवीन पोलीस चौकी कार्यान्वित करण्यात आली असून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचेमार्फत परिसरात सतर्क पेट्रोलिंग करण्यात येत आहे.

नाशिक शहर हद्दीतील सर्व पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांचीदेखील पेट्रोलिंग वाढविण्यात आली आहे.
(३) उक्त प्रकरणी ३ आरोपी व १ विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचेवर अंबड पोलीस ठाणेकडील दोषारोप क्र. १५३/२०१६ अन्वये मा. न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## नाशिक येथील पंचवटीमध्ये मटका, गावठी दारुचे आणि जुगाराचे अड्डे सर्रास सुरु असल्याबाबत

**(२०) ५७०८६ (२३-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील पोलिस आयुक्तांनी मिशन ऑल आऊट सुरु करुन सर्व अवैध धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले असतांनाही पंचवटी येथे मटका, गावठी दारुचे आणि जुगाराचे अड्डे सर्रास सुरु असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध धंद्यावर तसेच धंद्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) पंचवटी पोलीस ठाणे हद्दीत माहे मे, २०१६ मध्ये चोरुन लपुन मटका, गावठी दारुचे आणि जुगाराचे अड्डे चालविणारे इसम मिळून आले असता, जुगार अड्ड्यावर धाडी टाकुन एकुण ४१ आरोपीतांकडुन रुपये ४१,१२५/-ची रक्कम जप्त करण्यात आली असुन, मुंबई जुगार ॲक्ट कायद्याप्रमाणे ७ गुन्हे दाखल करण्यात आले त्यापैकी ५ गुन्ह्यात ३४ आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात आतापर्यंत दोषारोप पत्र पाठविण्यात आले आहे. तसेच गावठी व देशी दारुंची अवैध विक्री करणाऱ्या ११ इसमांकडून एकूण रुपये ३,८३१/- ची दारु जप्त करुन प्रोव्हीशन ॲक्ट कायदा कलम ६५ (ख) प्रमाणे १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) चोरुन लपुन अवैध धंदे चालु असल्याची माहिती प्राप्त होताच त्यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात आली असुन, सदर अवैध धंद्याना पोलीसांकडून पाठीशी घालण्यात येत नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेत डेंग्यू, मलेरिया आणि स्वाईन फ्ल्यू या आजारांचाही समावेश करण्याबाबत**

**(२१) ५७१५३ (२३-०८-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेतून पोलीस अधिकारी / कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना मोफत उपचार देण्यात येत असून सदरहू योजनेत डेंग्यू, मलेरिया आणि स्वाईन फ्ल्यू या आजारांचाही समावेश करण्यात यावा अशा स्वरुपाचा प्रस्ताव पोलीस मुख्यालयाने राज्य शासनाच्या गृह विभागाकडे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभाग यांना सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई पोलीस दलात वाहनचालकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२२) ५७८०० (२३-०८-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलात वाहनचालकांची तब्बल ९५० पदे रिक्त असून गत आठ वर्षापासून चालक पदाची भरती बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे सशस्त्र दलातील पोलिसांना चालकाचे काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पोलीस दलातील चालकांची पदे न भरण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७)** : (१) व (२) मुंबई पोलिस दलात वाहन चालकांची एकूण मंजूर पदे २,८७६ इतकी  असून त्यापैकी १,७८५ इतके वाहन चालक कार्यरत असून एकूण १,०९१ पदे रिक्त आहेत.

तथापि सद्य:स्थितीत सशस्त्र पोलीस दलाकडून ८८७ इतके पोलिस शिपाई चालक प्रतिनियुक्तीवर मोटार परिवहन विभागात उपलब्ध करुन देण्यात आले असून एकूण २०४ इतकी पदे रिक्त आहेत.

(३) बृहन्मुंबई पोलिस दलातील पोलीस शिपाई चालकांची भरती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाकडून करण्यात येते.

मोटार परिवहन विभागातील चालकांचा वेगळा संवर्ग निर्माण करणे व त्यांच्या पदभरती करिता नवीन सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सद्यस्थितीत पोलिस महासंचालक कार्यालयामार्फत प्रस्तावित केल्यानुसार सेवानिवृत्त, मयत व इतर कारणास्तव रिक्त होणाऱ्या चालकांच्या पदावर परवानाधारक पोलिस शिपायांमार्फत कर्तव्ये करुन घेण्यात येत आहेत.

---

**मौजे सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथे शेतकऱ्यांच्या केबल चोरी होत असल्याबाबत**

**(२३) ५८४९४ (२४-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील लांडेवाडी शिवारातील शेतक-यांच्या शेती पंपाच्या ५२ हजार रुपये किंमतीच्या केबल माहे एप्रिल ते मे, २०१६ या काळात चोरीला गेल्यानंतर सदर केबल चोरी करणा-या आरोपीस मुद्देमालासह सोनई पोलीसांच्या ताब्यात देवूनही अटक न करता आरोपीस सोडून देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केबल चोरीमुळे शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता न आल्याने आर्थिक नुकसान झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७)** : (१), (२) व (३) सदर प्रकरणी सोनई पोलीस स्टेशन येथे दि. ०५/०५/२०१६ गु.र.नं. ६१/२०१६ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्यात एका अल्पवयीन आरोपीस अटक करुन त्याच्याकडून चोरीला गेलेल्या वायरचे तुकडे हस्तगत करण्यात आले आहेत. अटक आरोपी हा विधीसंघर्षित बालक असल्याने त्यास बालन्यायालयात अभिरक्षा मिळण्याबाबत हजर करण्यात आले. तसेच एक आरोपी अद्याप फरार असल्याने त्या अनुषंगाने गुन्ह्याचा तपास चालू आहे.

नमूद गुन्ह्याव्यतिरिक्त सदर भागात केबल चोरीचे गुन्हे दाखल नसल्याने शेतकऱ्यामध्ये भितीचे वातावरण नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्याचे गृहविभागाचे अप्पर मुख्य सचिव यांनी पाहणी केलेल्या कोल्हापूर पोलिस वसाहतीत अनेक समस्या आढळून आल्याबाबत**

**(२४) ५९३२९ (२४-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव के.पी. बक्षी यांनी दिनांक २९ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास कोल्हापूर पोलिस वसाहतीची पाहणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अप्पर मुख्य सचिव यांनी केलेल्या पाहणीत कोणत्या समस्या आढळून आल्या आहेत तसेच या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे,
(३) तसेच कोल्हापूर जिल्हा पोलिस प्रशासनाने नविन घरांचा प्रस्ताव विशेष पोलिस महानिरिक्षकांच्या स्वाक्षरीने पोलिस महासंचालकाकडून गृह खात्याकडे पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावावर अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) अपर मुख्य सचिव (गृह) यांनी दि. २७/०४/२०१६ रोजी कोल्हापूर वसाहतीची पाहणी केली.
(२) कोल्हापूर येथील पोलीस निवासस्थाने ही जुनी असल्याने अपुऱ्या सोयी-सुविधा, कमी चटईक्षेत्राची निवासस्थाने, निवासस्थानांची कमी संख्या, सार्वजनिक प्रसाधनगृह, दुरुस्ती इ. समस्या आढळून आल्या.
(३), (४) व (५) पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या २२४ व्या बैठकीमध्ये कोल्हापूर येथे १,१५४ निवासस्थानांकरिता प्रशासकीय मान्यता दिली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगाव (जि. बुलढाणा) येथील पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस कार्यालयाकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत**

**(२५) ५९६७० (२३-०८-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील शहर व शिवाजी नगर पोलीस स्टेशन, पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस कार्यालयाकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत सदर बांधकाम प्रकल्पाच्या नियोजनाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची दिनांक १९/१०/२०१६ रोजी नियुक्ती केली असून पुढील कार्यवाही पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळातर्फे चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वसई-विरार शहरासाठी वाढीव पोलीस दल पुरविण्याबाबत

**(२६) ५९९९६ (२३-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहराची लोकसंख्या १८ लाखाच्या वर असून परिसरात खून, दरोडे, व चेन स्नॅचिंगचे गुन्हे वाढीस लागले असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे पोलीस दल वाढवून मिळावे अशी मागणी गत दोन वर्षे सातत्याने लेखी स्वरुपात स्थानिक लोकप्रतिनिधी, महापौर यांनी मा. मुख्यमंत्र्याच्या निदर्शनास आणूनही सदरहू मागणी अद्यापही पूर्ण करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याच्या दृष्टीने वाढीव पोलीस दल पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१७) :** (१) व (२) वसई व विरार परिसरामधील कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राखता यावी याकरिता गृह विभाग शासन निर्णय दिनांक २६/१२/२०१६ अन्वये पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या कायक्षेत्राखालील वसई पोलीस उपविभागाचे विभाजन करुन नवीन नालासोपारा व विरार उपविभागाची निर्मिती करण्यास व वसई, नालासोपारा, विरार या पोलीस उपविभगांची व त्यातंर्गत येणाऱ्या पोलीस ठाण्यांची पुर्नमांडणी करण्यास मान्यता देण्यचात आली आहे. तसेच सदर उक्त नवनिर्मित नालासोपारा व विरार उपविभागासाठी पोलीस उपअधीक्षकाचे प्रत्येकी ०१ पद उपलबध करुन देण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मिरा-भाईंदर व वसई विरार परिसरातील कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्न हाताळण्यासाठी मिरा-भाईंदर पोलीस आयुक्तालय निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण (ता.खेड, जि.पुणे) पोलीस ठाणेच्या आवारात जप्त करण्यात आलेल्या वाहनांना आग लागल्याबाबत**

**(२७) ६०८६१ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) पोलीस ठाणेच्या आवारात विविध गुन्हांत जप्त करण्यात आलेल्या २५ ते ३० दुचाकी वाहनांना दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास आग लागली असून सदर आगीत २ कर्मचारी भाजून जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०६-२०१७) :** (१) चाकण पोलीस ठाणेच्या आवारात विविध गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या २७ दुचाकी वाहनांना दि. ३१/०३/२०१६ रोजी आग लागली होती. परंतु सदर आगीमध्ये कोणीही पोलीस कर्मचारी जखमी झालेले नाहीत.
(२) सदर आग दिनांक ३१/०३/२०१६ रोजी दुपारी १२.३० च्या दरम्यान लागली. पोलीस स्टेशनच्या बाजूला असलेल्या नगर परिषदेच्या कचराकुंडीतून सदर आग पसरुन आवारातील जप्त दुचाकींना लागली असा अंदाज आहे. या प्रकरणी चाकण पोलीस ठाणे येथे जळीत क्र. १०/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हंगीरगा (ता.उमरी, जि.नांदेड) येथे सूडबुध्दीने गुन्हे दाखल करणाऱ्या उमरी पोलीस निरिक्षक यांना निलंबित करण्याबाबत**

**(२८) ६१०३४ (२३-०८-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हंगीरगा (ता.उमरी, जि.नांदेड) येथील डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त मंडळाच्या पदाधिका-यांवर सूडबुध्दीने खोटे गुन्हे दाखल करणा-या उमरी पोलीस निरिक्षक यांना निलंबित करण्याच्या मागणीबाबत दिनांक १७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास दलित समाजाच्या वतीने उमरी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी जयंती मंडळाचे पदाधिकारी यांना ठरवून दिलेल्या मार्गाऐवजी इतर मार्गाने मिरवणुक काढून पोलीसांकडून दिलेल्या आदेशाचे तसेच जिल्हा दंडाधिकारी, नांदेड यांच्या प्रतिबंधीत आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन सदर प्रकरणी जयंती मंडळाचे पदधिकारी यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन उमरी जिल्हा नांदेड येथे गु.र.नं. १२/२०१६ कलम १३४, १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, सहकलम १८८ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा सुडबुध्दीने दाखल करण्यात आला नसल्याचे व पोलीस निरीक्षक यांनी केलेली कार्यवाही कायदेशीर असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**वरणगाव, (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र पोलीस हौसिंग को-ऑपरेशनकडे सोपविण्याबाबत**

**(२९) ६१८१० (२३-०८-२०१६). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रासाठी जमीन संपादित झालेली असून सदरहू कामास तांत्रिक व प्रशासकीस मान्यता देवून उक्त इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र पोलीस हौसिंग को-ऑपरेशनकडे सोपविण्यात यावे असा प्रस्ताव दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या., मुंबई, यांच्याकडे मान्यता देण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोगरा (ता.लाखनी, जि.सांगली) परिसरातील शेतकऱ्यांसह अनेकांची सांगली येथील जागृती अग्रो फुड्स कंपनीकडून झालेली फसवणूक**

**(३०) ६३२८५ (२३-०८-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोगरा (ता.लाखनी, जि.सांगली) परिसरातील शेतकऱ्यांसह अनेकांची सांगली येथील जागृती अग्रो फुड्स कंपनीकडून शेळी पालन प्रकल्पाच्या नावाखाली विविध प्रकारची आमिषे देऊन फसवणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन, लाखनी येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :** (१), (२) व (३) मोगरा ता.लाखनी हे ठिकाण सांगली जिल्ह्यात नाही. मात्र सांगली जिल्ह्यात विश्रामबाग पो.स्टे. येथे सन २०१३ मध्ये जागृती ॲग्रो फुडस व शेळी पालन संस्थेने इरशाद हमेजखान शहकित यांनी संस्थेला एक शेळी खरेदी करुन त्या पोटी दर महिन्यास रु.४,०००/- इतकी रक्कम घेऊन ७० महिन्यात हि रक्कम रु.२०,०००/- इतकी होईल अशा प्रकारची भूल देऊन रु.२५,०००/- ची फसवणूक केली.

सदर प्रकरणी विश्रामबाग पो.स्टे. येथे दि. ०९/०३/२०१६ रोजी गु.र.नं ३६/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात ५ आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींना अटकपूर्व जामिन मा.न्यायालयाने मंजूर केला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मुकुटबन (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील पोलीस निवासस्थानांच्या नवीन इमारतींचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(३१) ६३९७५ (२३-०८-२०१६). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुकुटबन (ता.झरी, जि.यवतमाळ) येथील पोलीस निवास्थानांच्या नवीन इमारतींचे काम गत दोन वर्षापासून अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींची कामे पूर्ण करुन पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यास उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर इमारतींना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव कार्यवाहीधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उपळाई (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील महिला सरपंचास स्वातंत्र्यदिनी तिरंगा फडकविण्यास मज्जाव केल्याबाबत

**(३२) ६५०७८ (१६-०१-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपळाई (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील बौध्द महिला सरपंच दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ या स्वातंत्र्यदिनी तिरंगा फडकविण्यास जिल्हा परिषदेच्या शाळेत गेल्या असता त्यांना माजी सरपंचाने तिरंगा फडकविण्यास मज्जाव करुन, जातीवाचक शिवीगाळ करुन विद्यार्थ्यांसमोरच बेदम मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महिला सरपंच तक्रार करण्यास येरमाळा पोलीस स्टेशनला गेल्या असता पोलीस निरीक्षकांनी त्यांना १० तास थांबवून सायंकाळी ७ वाजता तक्रार मागे घेण्यास सांगून, तक्रार मागे न घेतल्यास दरोड्याच्या किंवा राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याचा गुन्हा दाखल करुन अटक करण्याची धमकी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हा पोलीस प्रमुख यांचेकडे तक्रार करुनही त्यांनी सदर प्रकरणी कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी माजी सरपंच व संबंधीत पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच राज्यात दलितांच्यावर होणाऱ्या हल्ल्यामध्ये वाढ झालेली असून पोलीस कारवाई करीत नसल्यामुळे दलितांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असल्याने कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

फिर्यादी महिला सरपंच यांनी झेंडावंदनासाठी जिल्हा परिषद शाळा, उपळाई येथे गेले. आरोपी माजी सरपंच यांनी झेंडा फडकावण्यासाठी गेले असता, फिर्यादीच्या पुतण्याने झेंड्याचा मान सरपंचाच असतो असे म्हणाल्यानंतर फिर्यादीने झेंडावंदन केले. राष्ट्रगित झाल्यावर पुढील कार्यक्रमास जात असताना आरोपी यांनी फिर्यादीचा पुतण्यास मारहाण केली. फिर्यादीने भांडण सोडविण्यास गेली असता, फिर्यादीसही मारहाण करण्यात आले.

(२) हे खरे नाही.

फिर्यादीने महिला संरपंच यांनी दिलेल्या फिर्यादप्रमाणे दि. १५/०८/२०१६ रोजी वेळीच गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणात वेळीच गुन्हा दाखल करुन तपास करण्यात आला आहे.

(४) सदर प्रकरणी पोलीस ठाणे येरमाळा गुरनं ७८/२०१६ कलम १४३, १४७, १४९, ३२३, ५०४ भा.दं.वि. कलम १३५ मुं.पो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना झेंडा फडकविण्याचे कारणावरुन मारहाण केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यातील ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुरावा हस्तगत झाल्याने गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र मा.न्यायालयात सादर केले आहे.

राज्यामध्ये सन २०१५ व सन २०१६ मध्ये दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या गुन्ह्यांची संख्या १५० ने कमी झालेली आहे. तसेच शाबीतीच्या संख्येत सुध्दा वाढ झालेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धर्मपूरी व गुरसाळे (ता.माळशिरस, जि.सोलापूर) या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध दारुचे धंदे चालू असल्याबाबत

**(३३) ६५२०२ (१७-०१-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मपूरी व गुरसाळे (ता.माळशिरस, जि.सोलापूर) या गावांमध्ये मोठया प्रमाणात अवैध दारुचे धंदे चालू असल्याबाबत स्थानिक जनतेने तसेच लोकप्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधिकारी, सोलापूर यांच्याकडे माहे ऑगस्ट, २०१६ च्या सुमारास तसेच वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अवैध धंद्याविरुध्द पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) सदर प्रकरणी अर्जदार दिपक शिवलिंग झेंडे यांनी २०१४ मध्ये पोलीस स्टेशनला अर्ज दिला होता. तसेच २०१६ मध्ये दि. ०९/०३/२०१६ रोजी एक निनावी अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) धर्मपूरी गावात अवैध दारु धंदे चालवणाऱ्यांवर सन २०१४ ते सन २०१६ या कालावधीत एकूण २९ आरोपींविरुध्द २८ गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून एकूण १,९१,९७२/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच ३ आरोपीविरुध्द प्रोव्ही ॲक्ट कलम ९३ प्रमाणे व ३ आरोपीविरुध्द सीआरपीसी १४४ (३) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

गुरसाळे गावात अवैध दारु धंदे चालवणाऱ्यांवर सन २०१४ ते सन २०१६ या कालावधीत एकूण ११ आरोपीविरुध्द ११ गुन्हे दाखल करुन त्यांच्याकडून एकूण ४३,८७५/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच ३ आरोपीविरुध्द प्रोव्ही ॲक्ट कलम ९३ प्रमाणे व २ आरोपीविरुध्द सीआरपीसी १४४ (३) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकी (जि.पूणे) गावातील आंतरजातीय विवाह करणाऱ्यास वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या जातपंचायतीने येरवडयातील २०० कुंटुबांवर बहिष्कार घातल्याबाबत.**

**(३४) ६५७२५ (१७-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकी (जि.पूणे) गावातील वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या जात पंचायतीने आंतरजातीय विवाह करणाऱ्या येरवडयातील सुमारे २०० कुंटुबांवर समाजातून बहिष्कार घातला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यातील अशा जातपंचायतीवर बंदी घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१७) :** (१) आंतरजातीय विवाह केला म्हणून लिंगायत गवळी समाजाच्या एक कुटुंबावर बहिष्कार घातलेबाबत एक गुन्हा व समाजातून बहिष्कार केल्याच्या कारणावरुन आत्महत्या केल्याबाबतचा एक असे दोन गुन्हे दाखल आहेत. खडकी (जि.पुणे) गावातील वीरशैव लिंगायत गवळी समाजाच्या २०० कुटुंबावर सामाजिक बहिष्काराची गुन्हे दाखल नाहीत.

(२) याबाबत खडकी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २८०/२०१४ भा.दं.वि.. कलम ३८५, १२० (ब), ३५२, ३२३, ३२१, ५०४, ३४ नागरी हक्क संरक्षण अधिनियम कलम ७(१) ड प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील ६ आरोपींना अटक करण्यात आले आहे आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मा.न्यायालयात सुनावणी होऊन सदरचा खटला आपसात ताडजोड झाला आहे.

दुसऱ्या गुन्हयामध्ये चंदननगर पोलीस स्टेशन गु.र.नं. १९०/२०१६ भां.द.वि. कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासामध्ये फिर्यादीचे वडीलांनी दारुच्या नशेत दि. २९/०८/२०१६ रोजी राहते घरी एकटे छताचे पंख्यास गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यामुळे दिलेली तक्रार गैरसमजूतीने दिली असल्याचे व कोणाविरुध्द तक्रार नसल्याचे फिर्यादीने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

(३) सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तीचे संरक्षण करण्यासाठी शासनाने नवीन कायदा केला असून, सदर कायदा मा.राष्ट्रपती महोदय यांच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## सोलापूर जिल्ह्यात गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्याबाबत

**(३५) ६७६४१ (११-०१-२०१७). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरच्या ग्रामीण पोलीस अधिक्षकांनी केलेल्या चौकशीत ५८ गंभीर गुन्ह्याचा तपास एक वर्षानंतरही अपूर्ण असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यंत गंभीर गुन्हा प्रकरणी पोलीसांकडून विहित मुदतीत तपास पूर्ण होत नसल्याने संशयाच्या फायद्यामुळे आरोपी सुटण्यास पोलीसांची असलेली उदासिनता कारणीभूत असून गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये सांगोला (जि.सोलापूर) येथील खटल्याच्या सुनावणीच्यावेळी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात १ वर्षावरील एकूण ५८ गंभीर गुन्हे तपासावर प्रलंबित होते. दरम्यानचे कालावधीत ५५ गुन्ह्याची निर्गती करण्यात आली असून ०३ गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत. सदरच्या ०३ गुन्ह्यांपैकी ०१ गुन्ह्याचा तपास सी.बी.आयकडे असून ०१ गुन्ह्याचा तपास मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने स्थगित करण्यात आला आहे. तर ०१ गुन्हा हस्ताक्षर तज्ञांचा अभिप्राय येणेवर तपासावर प्रलंबित आहे.

(२) व (३) सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या दि. २४/०५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी स्वतंत्र तपास पथक स्थापन करण्यात आले असून सदर तपास पथकाचे कामकाज १ जुलै, २०१५ पासून सुरु करण्यात आले आहे.

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात २३ पोलीस ठाणेकरीता एकूण २६ स्वतंत्र तपास पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर तपास पथकात एकूण २६ पोलीस अधिकारी व ८४ पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## धुळे शहरासह परिसरात दागिने लांबविण्याचे प्रमाण वाढल्याबाबत

**(३६) ६७८५७ (११-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील देवपूरातील सदाशिव नगरात राहणाऱ्या वृध्द महिलेला पत्ता विचारण्याच्या बहाण्याने बोलावून सदर महिलेच्या गळयातील ५० हजार रुपये किंमतीची सोनपोत हिसकावून दोन मोटर सायकलस्वारांनी पलायन केल्याचे तसेच वल्लभ नगर येथील शनी मंदिरासमोरील रस्त्यावर मोटारसायकलने आलेल्या दोन जणानी एका महिलेच्या गळयातील चेन खेचून पलायन केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत काही दिवसापासून शहरासह परिसरात दागिने पळविण्याचे प्रमाण वाढले असून त्याला पायबंद घालण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०४-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

धुळे शहरातील सदाशिव नगर येथे फिर्यादिस आरोपीतांनी आवाज देवुन मोबाईल फोन घ्या असे सांगितले असता मोबाईल फोन घेण्यास हात पुढे केला असता अनोळखी चोरट्याने सोन्याची मंगलपोत जबरीने ओढून घेऊन पळून गेले म्हणून गुन्हा दाखल आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी अज्ञात आरोपीतांविरुध्द देवपूर पोलीस ठाण्यात भाग-५ अपराध क्रमांक ८१/२०१६ भादंवि कलम ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा करण्यात आला आहे.असे गुन्हे पुन्हा घडू नयेत म्हणुन स्थानिक पोलीस ठाण्याअंतर्गत बीट मार्शल गस्त यापुर्वीच सुरु करुन त्या वाढविण्यात आल्या आहेत. तसेच पोलीस ठाण्याच्या प्रथम व दुय्यम वाहनांकरवी गस्त घालून अचानकपणे नाकाबंदी, कोबींग व ऑपरेशन ऑल आऊट योजना प्रभावीपणे राबवून गुन्ह्यांना पायबंद घालण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील सिमावर्ती भागात बेरोजगारांना रेल्वेत नोकरी लावण्याचे आमिश दाखवून फसवणूक करण्यात आल्याबाबत**

**(३७) ६८१५८ (०७-०२-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील सिमावर्ती भागात सुमारे ५०० बेरोजगारांना रेल्वेत नोकरी लावण्याच्या नावाखाली फसवणूक करुन कोट्यवधी रुपये घेणाऱ्या हैद्राबाद येथील एका महिलेस, बिलोली न्यायालयाने कोठडी सुनावली असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे. बिलोली न्यायालयाने एका महिलेस न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

(२) सदर प्रकरणी नांदेड जिल्ह्यात खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड गु.र.नं. ७४/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ३४

२) पोलीस स्टेशन बिलोली गु.र.नं. ६८/२०१५ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ३४.

३) पोलीस स्टेशन देगलुर गु.र.नं. २३२/२०१६ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वरील गु.र.नं. ६८/२०१५ व गु.र.नं. २३२/२०१६ या गुन्ह्यात एक महिला आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. तसेच गु.र.नं. ७४/२०१५ च्या गुन्ह्यात ३ आरोपी असून त्यांना अटकपुर्व जामिन मिळाला आहे. गु.र.नं. ६८/२०१५ बाबत न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे व उर्वरित दोन गुन्हे तपासावर आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

### दिवेगव्हाण (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील प्रदीप पांडुरंग निंबाळकर या विद्यार्थ्याचा खुन करण्यात आल्याबाबत

**(३८) ६८३३९ (११-०१-२०१७). श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवेगव्हाण (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथील प्रदीप पांडुरंग निंबाळकर या १४ वर्षाच्या इयत्ता नववीमधील विद्यार्थ्याचा खुन करण्यात आला असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बेपत्ता झालेल्या मुलाचा मृतदेह हिंगणी देलवडी शिवारात उसाचा फडात मिळाला असून पोलीसांना घटनास्थळी मृत प्रदीपच्या गळयावर जखमा आढळून मृतदेहाजवळ पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने अर्धवट खड्डा खणून ठेवला असल्याने नरबळी देण्याच्या उद्देशाने खुन करण्यात आल्याचा संशय असुन पोलीसांनी सदर प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी करमाळा पोलीस ठाणे भाग-५ येथे गु.र.नं. ३७९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०२,२०१,३४ प्रमाणे दि. २०/०८/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर गुन्ह्याचा तपासात मयत प्रदिप याच्या भावाकडे चौकशी केली असता प्रदिप याचा खुन त्याने स्वत: केला असलेची कबुली दिली आहे. आरोपी हा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याने त्यास ताब्यात घेवून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. प्रेताच्या जवळ खणण्यात आलेला खड्डा हा केवळ प्रेत पुरुन पुरावा नाहीसा करण्याच्या

उद्देशाने खणल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर प्रकरणी नरबळी अथवा अंधश्रध्देतून बळी देण्यात आल्याचे अथवा खड्डा खणल्याचे तपासात निष्पन्न झालेले नाही.
(३) विलंब झालेला नाही.

---

**बदलापूर येथे गावठी दारुसाठी लागणाऱ्या गुळाचा टेम्पो पोलिसांनी जप्त केल्याबाबत**

**(३९) ६८८०२ (११-०१-२०१७). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे गावठी दारुसाठी लागणाऱ्या गुळाचा टेम्पो पकडून सुमारे १२०० किलोचा साठा पोलिसांनी जप्त केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१६ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गुळाचा अवैध साठा करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) होय हे खरे आहे.
पोलीस आयुक्त परिसरातील परिमंडळ-४, उल्हासनगर मधील बदलापूर पूर्व पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १४.९.२०१६ रोजी प्लास्टीकच्या गोणींमध्ये सुमारे २०० किलो गुळ व महेंद्रा पिकअप टेम्पो असा एकूण २.७६ लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.
(२) सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली असून यातील आरोपी विरूध्द सबळ पुरावा झाल्याने मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरेड (जि.नागपूर) नगरपरिषदेत कार्यरत सहा. कर निरिक्षक व एका शिपायाविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(४०) ६९७७३ (१९-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरेड (जि.नागपूर) नगरपरिषदेत कार्यरत सहा.कर निरिक्षक व एका शिपायाविरुध्द प्लॉटचे फेरफार करण्याकरिता चार हजार रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी च्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) या प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड, नागपुर ग्रामीण येथे १. संजय संतोषवार, सहायक कर निरीक्षक २. श्री.दिलीप चव्हाण, शिपाई दोघेही नगर परिषद कार्यालय उमरेड जि.नागपुर यांचेविरूध्द अपराध क्र.४०७/२०१६ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

**गोखिवरे, (ता.वसई, जि.पालघर) येथील कारबेरी इंडिया शोरुमने शेकडो ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत**

**(४१) ६९७९६ (१६-०१-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोखिवरे (ता.वसई, जि.पालघर) येथील कारबेरी इंडिया शोरुमने शून्य व्याजदर, आणि विविध स्कीमच्या आधारे चारचाकी गाड्या घ्या अशी जाहिरात देऊन शेकडो ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत माहे जुलै, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फसवणूक झालेल्या लोकांनी संबंधित पोलीस स्टेशनला तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०५-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) कारबेरी इंडिया कार ॲन्ड हॅपिनेन्स डिलीव्हर, सानव्हिला गोखीवरे ता.वसई येथे शॉप खोलून लोकांना ४०,०००/- रुपयांमध्ये कार खरेदी लाखो का व्यापार ही स्किम सुरु करुन लोकांकडून कार न देता पैसे जमा केले व जाहिरात करुन फसवणूक केलेबाबत वालीव पो.स्टे. येथे गु.र.क्र. ४४३/१६, भादंवि कलम ४२०, ३४ अन्वये दि.२६.०८.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नविन नाशिक परिसरामध्ये अंबड पोलीस स्टेशनचे विभाजन होऊन नविन चुंचाळे शिवार पोलीस स्टेशनची निर्मिती करणेबाबत

**(४२) ७०७७५ (१७-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन नाशिक परिसरात वाहन जळीत कांड तसेच खुनाचे अनेक प्रकार घडले असून या परिसरामध्ये कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता अंबड पोलीस स्टेशनचे विभाजन करुन चुंचाळे शिवार येथे नविन पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रस्ताव देखील शासनाकडे सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव अनेक वर्षापासून प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून चुंचाळे शिवार येथे नविन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये प्रस्तावित चुंचाळे पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील मागील तीन वर्षात घडलेल्या भाग १ ते ५ मधील गुन्ह्यांची सरासरी केवळ ०५ इतकीच होती. गृह विभाग शासन निर्णय दिनांक २३.०१.१९६० अन्वये नविन पोलीस ठाण्याच्या निर्मितीकरीता गुन्ह्यांची सरासरी ही १५० होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर ठिकाणी पोलीस ठाणे देय नसल्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ११.११.२०१६ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहूवाडी (जि.कोल्हापूर) येथील बंद असलेली पोलीस चौकी सुरु करण्याबाबत

**(४३) ७१०८६ (१७-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तसेच उत्तर भागातील कानसा खोरं, शित्तूर-वारुण व भेडसगाव परिसरातील जनतेला तुरुकवाडी फाटा हे ठिकाण सर्व सोयींनी युक्त असून सदर ठिकाणी तीन वर्षापूर्वी सुरु केलेली पोलीस चौकी कायम बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील लोकांना शुल्लक कारणांसाठी देखील शाहुवाडी पोलीस ठाणे येथे जावे लागत असल्यामुळे लोकांची गैरसोई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने तुरुकवाडी ता.शाहुवाडी येथील पोलीस चौकी कायम सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. शाहुवाडी पोलीस ठाण्याकडून तुरूकवाडी दुरक्षेत्रासाठी पोलीस कर्मचारी नेमले जात असून सदरचे दुरक्षेत्र हे कायमस्वरूपी कार्यरत आहे. सदर ठिकाणी नेमलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांकडून नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात ५ ठिकाणी मिनी फोरेन्सिक लॅब स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत

**(४४) ७१६२९ (११-०१-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील फॉरेन्सिक लॅबमध्ये असलेली सुमारे ३० हजार प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात ५ ठिकाणी मिनी फॉरेन्सिक लॅब स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लॅब कोणत्या ठिकाणी स्थापन करण्यात येणार आहेत,
(३) तसेच नवीन फॉरेन्सिक लॅब केव्हापासून कार्यान्वित होणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१), (२) व (३) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयांतर्गत ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, धुळे व चंद्रपूर या पाच ठिकाणी लघु प्रयोगशाळा निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### ध.टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) येथे पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत

**(४५) ७१८६६ (१७-०१-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ध.टाकळी (ता.पूर्णा, जि.परभणी) हे गाव चुडावा पोलीस ठाण्यात वर्ग केलेले असून ग्रामस्थांच्या सोयीच्या दृष्टीने सदर गावामध्ये पोलीस चौकी निर्माण करण्याबाबतचे निवेदन सरपंच, ध.टाकळी यांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उप विभागीय पोलीस अधिकारी, पूर्णा यांनी पोलीस अधिक्षक, परभणी यांना दिनांक ५ मार्च, २०१६ रोजी ध.टाकळी येथे पोलीस चौकी निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ध.टाकळी येथे पोलीस चौकी निर्माण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०५-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी मौजे धनगर टाकळी येथे पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत पोलीस अधीक्षक, परभणी यांच्याकडे शिफारस केली होती. तथापि शासन परिपत्रक दिनांक २३.०१.१९६० मधील यार्डस्टिकनुसार मौजे धनगर टाकळी येथे पोलीस चौकी निर्माण करण्याविषयीचे निकष पूर्ण होत नसल्याचे पोलीस अधीक्षक, परभणी यांनी उप विभागीय पोलीस अधिकारी, पुर्णा यांना कळविले आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक, परभणी यांनी याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील अवैध क्रिकेट सट्टयाबाबत

**(४६) ७२१६३ (११-०१-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यात क्रिकेट सट्टयामध्ये विद्यार्थी तसेच युवकांची फसवणूक होऊन मोठया प्रमाणावर आर्थिक उलाढाल होणाऱ्या अवैध सट्टा बुकींवर पोलीसांमार्फत कार्यवाही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ठोस कार्यवाही होऊन क्रिकेटवर सट्टा घेणाऱ्या बुकींच्या साखळीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

नांदेड जिल्ह्यात मुखेड येथे दिनांक २२/०४/२०१६ रोजी IPL T २०/२० मॅच गुजराथ विरूध्द हैद्राबाद संघावर क्रिकेट सट्टा चालत असल्याची गोपनिय माहिती मिळाल्यावरून दिनांक २३/०४/२०१६ रोजी पोलीस स्टेशन मुखेड येथे गु.र.नं. १८/२०१६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे २ आरोपींविरूध्द कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये सदरचा गुन्हा हा एस.एस.सी. नंबर २२९/०१६ दिनांक ०४/०६/२०१६ अन्वये मा.न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**गडचिरोली शहरातील संस्कार बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे संचालक यांनी नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून युवकांची फसवणूक केल्याबाबत**

**(४७) ७२३६७ (११-०१-२०१७). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली शहरातील संस्कार बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे संचालक प्रा.भास्कर जयदेव मांदाळे यांनी नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून युवकांकडुन प्रत्येकी ५० हजार ते दीड लक्ष रूपयांपर्यत देणगीच्या स्वरूपात रक्कम जमा केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार एकुण किती युवकांकडून किती रक्कम घेतली आहे व संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आरोपीने ३४ मुला मुलींकडून सेक्युरीटी डिपॉजिट म्हणून एकूण २१,५८,५००/- रूपये घेऊन फसवणूक केली असल्यामुळे एका आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे अप.क्र. २०/२०१६ भादंवि कलम ४२० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आली होती. गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पोलिसांसाठी बॉम्बसूट खरेदी करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४८) ७२३९७ (१६-०१-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर पोलिसांना चांगली सुरक्षा प्रदान करण्यासाठी बॉम्बसूट खरेदी करण्याचा निर्णय गृह विभागाने सन २००८ मध्ये घेतला असून त्याकरिता निविदा मागविण्यात आल्यानंतर अनुभव नसलेल्या कंपनीला निविदा देण्यात येवून सदर कंपनीने पैसे घेऊनही बॉम्बसूट पुरवले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधित कंपनी व कंपनीला निविदा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदरची बाब ही सन २००९ मध्येच निदर्शनास आली आहे.

(२) होय, सदर प्रकरणीची चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणी लाच-लुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालाच्या आधारे मेसर्स

टक्नोट्रेड इम्पेक्स इंडिया प्रा.लि. मुंबई यांचे संचालक यांचेविरूध्द कुलाबा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २१/२०१२ भा.दं.वि. संहिता कलम ४२०,४०६,४६९,४११,४१८,१२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई तपास करीत आहे.

त्याचप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी सादर केलेल्या अहवालाच्या आधारे या प्रकरणी तत्कालीन पोलीस उपमहानिरिक्षक यांचे विरूध्द शासन ज्ञापन दि.१२.०३.२०१३ अन्वये विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यासंदर्भात दि. १७.०९.२०१३ च्या आदेशान्वये प्रधान सचिव तथा विशेष चौकशी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रस्तुत चौकशी सध्या चौकशी अधिकारी यांच्याकडे प्रलंबित आहे. पोलीस महासंचालक कार्यालयातील दोषी ठरविण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांच्यावर दोषारोपावरून १ वर्ष वेतनवाढ स्थगितीची शिक्षा देण्यात आलेली असून दोषारोप सिध्द न झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांना दोष मुक्त करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक प्रभाकर पठाडे यांच्या आत्महत्येबाबत**

**(४९) ७२८१३ (११-०१-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील जालना तालुका पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक प्रभाकर पठाडे यांच्यावर पशुखादय प्रकरणात लाच घेतल्याचा आरोप केल्यामुळे ते आत्महत्या करीत असल्याचे त्यांनी लिहिलेल्या सुसाईड नोट मध्ये आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०४-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सदर गुन्ह्याच्या तपासात श्री.प्रभाकर पठाडे यांनी लिहिलेली सुसाईड नोट हस्तगत करण्यात आली असून त्यामध्ये त्यांनी त्यांच्याकडे तपास असलेला गु.र.नं.३२६/२०१६ मधील फिर्यादी यांनी त्यांच्यावर पैसे घेतल्याचे आरोप केल्याने त्यांनी आत्महत्या करीत असल्याचे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने दोन आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन, जालना येथे गु.र.नं. ३९९/२०१६ भा.दं.वि. कलम ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्याविरूध्द मा.न्यायालयात दोषरोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईत गृहनिर्माण संस्था आणि दुकानदारांनी स्वत:हुन नो पार्कींगचे फलक लावल्याबाबत**

**(५०) ७२९३३ (११-०१-२०१७). ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत आपला परिसर नो पार्कींग झोन व्हावा यासाठी वाहतूक विभागाकडे दर आठवडयाला ५ ते १० अर्ज येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण संस्था आणि दुकानदार स्वत:हून नो पार्कींगचे फलक लावीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी वाहतूक विभागाकडे येणाऱ्या अर्जावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच नियमबाह्य फलक लावणाऱ्या गृहनिर्माण संस्था व दुकानदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०५-२०१७) :** (१) होय

(२) गृहनिर्माण संस्था आणि दुकानदार स्वत:हून नो पार्किंगचे फलक लावत आहेत, असे निदर्शनास आलेले नाही.

(३) "नो पार्किंग झोन" बाबतचे अर्ज प्राप्त होताच संबंधित वाहतूक विभागाचे अधिकारी हे सदर जागेस भेट देवून जागेची पाहणी करून सदर ठिकाणी नो पार्किंग झोन करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल संबंधित पोलीस उपायुक्तांना सादर करतात. त्यानंतर नो पार्किंग झोन आवश्यक असल्यास त्यानुसार पोलीस उपायुक्तांकडूना अधिसूचना जारी केली जाते. सदर अधिसूचनेची प्रसिध्दी जनतेस व परिसरातील लोकांना देवून त्याबाबतची अंमलबजावणी करण्यात येते.

गृहनिर्माण संस्था आणि दुकानदार स्वत:हून नो पार्किंगचे फलक लावीत आहेत असे आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.